मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २४८ ✻ सातारा ✻ बुधवार ✻ दि. २२ मे २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# बारावीचा निकाल जाहीर, मुलींनी मारली बाजी




## राज्यात एकमेव विद्यार्थिनीला १०० टक्के गुण

**छत्रपती संभाजीनगर विभागातील एका विद्यार्थिनीला १०० टक्के गुण मिळाले आहेत. १०० टक्के गुण मिळवलेली ही राज्यातील एकमेव विद्यार्थिनी आहे. या विद्यार्थिनीला प्रत्यक्ष परीक्षेत ५८२ आणि क्रीडा गुण १८ असे एकूण ६०० पैकी ६०० गुण मिळाले आहेत, अशी माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली.**

**राज्य मंडळाने आज बारावीचा निकाल जाहीर केला. यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्चदरम्यान घेण्यात आली. यंदा राज्यातील १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. राज्यातील ३ हजार ३२० केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली.**

**गोसावी म्हणाले, की वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनीने १०० टक्के गुण मिळवणे कौतुकास्पद आहे. खेळात केलेली मेहनत आणि अभ्यासातील सातत्य याचा परिणाम तिच्या निकालात दिसत आहे.**

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यंदा बारावीचा निकाल ९३.३७ टक्के लागला आहे. सर्वाधिक ९७.५१ टक्के निकाल कोकण विभागाचा, तर मुंबई विभागाचा सर्वांत कमी ९१.९५ टक्के निकाल लागला.

यंदाच्या निकालात मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. ९२.६० टक्के मुलगे, तर ९५.४९ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. यंदा निकाल वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यार्थी, पालकांना दुपारी एक वाजल्यापासून निकाल ऑनलाइन पाहता येईल. विद्यार्थ्यांना **mahahsscboard.in, mahresult.nic.in** या संकेतस्थळावरून निकाल पाहता येणार आहे.

गोसावी म्हणाले, की बारावीची सहा माध्यमांतील १५४ विषयांची परीक्षा घेण्यात आली. अंतर्गत परीक्षेचे गुण ऑनलाइन घेतल्यामुळे निकाल लवकर जाहीर होण्यास मदत झाली. गैरप्रकारांची संख्या घटली. राज्यस्तरावर २७१ भरारी पथके नेमण्यात आली होती, तसेच जिल्हा स्तरावरही स्वतंत्र भरारी पथके नियुक्त करण्यात आली होती.

# विधानसभेला अजितदादांविरोधात कुटुंबातलाच उमेदवार देणार?

## शरद पवारांचं 'सेफ' उत्तर



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीदरम्यान महाराष्ट्रात बारामती लोकसभा मतदारसंघात झालेली पवार विरुद्ध पवार राजकीय लढाई चांगलीच चर्चिली गेली. या लढाईचा दुसरा अंक विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. कारण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीच्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात पत्नी सुनेत्रा पवार यांना लोकसभेच्या मैदानात उतरवल्याने त्याचा वचपा काढण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे विधानसभा निवडणुकीत अजित पवारांविरोधात कुटुंबातील एखादा तरुण चेहरा पुढे करतील, असं बोललं जात आहे. अशातच याबाबतच्या थेट प्रश्नाला शरद पवार यांनी चाणाक्षपणे उत्तर देत लगेच आपले पत्ते उघड करणं टाळलं आहे.

शरद पवार यांना एका यूट्यूब चॅनलवरील मुलाखतीदरम्यान बारामती विधानसभेच्या संभाव्य उमेदवाराबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना पवार यांनी म्हटलं आहे की, उमेदवार कोण असेल, हे आज सांगता येणार नाही. विधानसभा निवडणुकीला आणखी वेळ आहे. लोकसभा निवडणुकीचं चित्र कसं होतंय, उद्या देशात कोणाची सत्ता येतेय, महाराष्ट्रात भाजपची काय स्थिती राहतेय, या गोष्टी पाहाव्या लागतील. भविष्यात भाजपची सत्ता महाराष्ट्रात येऊ नये, असा आमचा प्रयत्न राहणार आहे. या गोष्टीला महाराष्ट्रातील ठिकठिकाणी जे सोईचे उमेदवार असतील, ते देण्याचा आमचा प्रयत्न राहील. निदान मी तरी त्याबाबत अद्याप विचार केलेला नाही.

दरम्यान, शरद पवार हे आपल्या राजकीय डावपेचांचा अंदाज शेवटच्या क्षणापर्यंत येऊन देत नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीबाबतही पवार आपल्या याच इतिहासाची पुनरावृत्ती करणार का, हे पाहावं लागेल. कारण अजित पवारांचे सख्ख्ये पुतणे युगेंद्र पवार यांची लोकसभा निवडणुकीपासून बारामती आणि परिसरातील सक्रियता वाढली असून त्यांनी जनसंपर्क वाढवण्यावर भर देण्यास सुरुवात केली आहे.

**सुनेत्रा पवारांना उमेदवारी देण्याच्या भाजपकडून सूचना?**

राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजित पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघात सुनेत्रा पवार यांनी तिकीट दिलं. भाजपच्या आग्रहामुळेच अजित पवारांनी हा निर्णय घेतल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून करण्यात आला होता. या मुद्द्यावरून मुलाखतीदरम्यान प्रश्न विचारण्यात आल्यानंतर शरद पवार म्हणाले की, याबाबत माझ्याकडे अधिकृत माहिती नाही. मात्र बाहेर अशी चर्चा आहे की, तुम्ही आमच्यासोबत आलाय ते स्पष्टपणे दाखवण्यासाठी बारामतीतून सुनेत्रा पवार यांनाच उमेदवारी द्या, असं भाजपकडून अजित पवार यांना सुचवण्यात आलं होतं. भाजपच्या कामाची पद्धत सर्वांना माहीत आहे. ते जे ठरवतात ते ऐकावं लागतं, असा टोला त्यांनी अजित पवारांना लगावला आहे.

# नाशिक विभागात पहिले, तर राज्यात दुसरे, निकाल ९४.७१ टक्के, मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९६.३२ टक्के

**नाशिक -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत नाशिक विभागात नाशिक प्रथम स्थानावर असून, राज्याचा निकाल बघता नाशिक विभागाची टक्केवारी दुसऱ्या क्रमांकावर आली आहे. उत्तीर्णतेचे प्रमाण बघता यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. राज्यात कोकण ९७.५१ टक्के निकालासह प्रथम, तर नाशिक विभाग ९४.७१ टक्के मिळवत दुसऱ्या क्रमांकावर आहे. नाशिक विभागात मुलींचे प्रमाण ९६.३२ टक्के, तर मुलांच्या यशस्वीतेचे प्रमाण ९३.३९ टक्के इतके आहे.

शिक्षण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, नाशिक मंडळातून १,५७,३४५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यात ८६,४९१ विद्यार्थी, तर ७०,८५४ विद्यार्थिनींचा समावेश होता. यात ८०,७७८ विद्यार्थी, तर ६८,२५१ विद्यार्थिनींनी यश मिळविले. मंगळवारी (दि. २१) दुपारपासून बोर्डाच्या संकेतस्थळावर निकाल उपलब्ध करून देण्यात आला होता. विद्यार्थ्यांचे लक्ष लागून असलेल्या या निकालाची तारीख बोर्डाने जाहीर केल्यानंतर परीक्षार्थींची धाकधूक वाढली होती. ऑनलाइन निकाल हाती पडल्यानंतर मात्र विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.

# 'महायुतीमध्ये सुरुवातीपासूनच महाभारत, महायुती ४ जूनला विखुरली जाणार', नाना पटोलेंचा मोठा दावा

**मुंबई :** महायुतीमध्ये महाभारत सुरुवातीपासूनच होतं. आताही आहे आणि अजून ते वाढेल. ४ तारखेला जेव्हा निकाल येतील तर दुपारी बारा वाजेपर्यंत महायुती ही विखुरलेली आपल्याला पाहायला मिळणार आहे, असा मोठा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. आम्ही मधल्या काळातही सांगत होतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अग्निविर योजना जी आखलेली आहे ती फक्त मिलिटरीमध्येच नाही तर राजकीय व्यवस्थांमध्ये सुद्धा आहे. त्यामुळे ना शहिदांचा दर्जा, ना पेन्शन अशी परिस्थिती अनेक राजकीय पक्षांची आहे. नरेंद्र मोदींनी केंद्रीय तपास यंत्रणेच्या आधारावर देशाच्या अनेक राजकीय पक्षांना फोडून ज्या पद्धतीने महायुती निर्माण केली, आणि जे त्यांच्याबरोबर गेले त्यांची हालत काय होणार आहे हे ४ तारखेला आपल्याला दुपारच्या १२ वाजेपर्यंत कळणार आहे, असा टोला नाना पटोले यांनी लगावला आहे.

भिवंडी येथील भाजप उमेदवार कपिल पाटील यांनी त्यांच्या मतदारसंघात बोगस मतदान झाल्याच आरोप केलाय. याच मुद्द्यावरुन त्यांची मतदान केंद्राबाहेर पोलिसासोबत बाचाबाची होत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय. या व्हिओवर नाना पटोले यांनी टीका केली आहे. भाजपला सत्तेची मस्ती आहे, आणि ती मस्ती अजूनही उतरलेली नाही. लोकांचा कौल हा त्यांच्या विरोधात आहे. ते सत्तेच्या मस्तीमुळे पोलिसांनाही शिव्या घालायला मागेपुढे पाहत नाहीत, असे चित्र आपण पाहतो आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

**पुण्याच्या घटनेवरुनही पटोलेंचा भाजपवर निशाणा**

पुण्याच्या हिट अँड रन केसवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी भाजपवर सडकून टीका केली. न्यायालयाच्या निर्णयाला आक्षेप घेण्याचे कुठलेही कारण नाही. पण राज्यात ज्याप्रमाणे कायदा आणि सुव्यवस्था बिघडलेली आहे, आणि राज्याच्या सरकारने एक्साईज वाढवण्यासाठी दारूची दुकानं, मोठ्या प्रमाणात ड्रग्स जो गुजरातमधून महाराष्ट्रात आणायची व्यवस्था केली. त्याचे परिणाम आपण पाहतोय, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

# मतदानाची टक्केवारी का घसरली : मुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

**मुंबई :** राज्यामध्ये पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यामध्ये मतदान सोमवारी पार पडले. मतदानाची टक्केवारी कमी झाली. या प्रकरणाची राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दाखल घेत याला मतदान प्रक्रियेतील संथपणा कारणीभूत आहे का ? याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी मुख्य सचिव डॉ. नितिन करीर यांना दिले आहेत.

२० मे रोजी लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि राज्यातील शेवटच्या टप्प्यात १३ लोकसभा मतदारसंघासाठी मतदान झाले. यावेळी मुंबईमधील सहा मतदारसंघाचाही समावेश होता. यामध्ये झालेल्या मतदानावेळी मतदारांना अनेक त्रासांना सामोरे जावे लागले. अनेक मतदान केंद्रावर प्रशासनाचा ढिसाळ कारभार बघायला मिळाला. ईव्हीएममध्ये बिघाड, संथ गतीने सुरु असलेले मतदान, उन्हाची तीव्रता अधिक असतानाही मतदान केंद्रात पुरेशा मूलभूत सुविधांचा तुटवडा अशा अनेक समस्यांना मतदारांना सामोरे जावे लागले. मुंबईमधून अनेक तक्रारी समोर आल्या होत्या. या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेतली आहे .

मतदानावेळी झालेल्या गोंधळात वृद्ध मतदारांना रांगेचा तसेच कडक उन्हाचा त्रास मतदारांना सहन करावा लागला. मतदारांना गैरसोयीचा सामोरे जावे लागले. यामुळे मतदानावर झालेला परीणाम या सर्व बाबींची सविस्तर चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मुख्य सचिवांना आदेश दिले आहेत. यावेळी पाचव्या टप्प्यातील मतदान प्रक्रियेची प्रशासनाने पुरेशी काळजी घेतली नव्हती का? मतदान टक्केवारी कमी का झाली? प्रशासन कुठे कमी पडले? याची तात्काळ चौकशी करावी, असे या आदेशामध्ये सांगितले आहे.

# उजनी पाणलोट क्षेत्रात लाँच उलटली, तिघे जण बेपत्ता

**इंदापूर :** उजनी पाणलोट क्षेत्रातील कळाशी गावाकडून कुगावकडे जाणारी लाँच जोराच्या वाऱ्याने उलटल्यामुळे लाँचमधील चार जण बुडून बेपत्ता झाले. धक्कादायक घटना आज सायंकाळी साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास कळाशी गावानजीकच्या भीमेच्या पात्रात घडली. बेपत्ता झालेल्यांपैकी एक जण पोहत पाण्याबाहेर आला. बेपत्ता असणारांमध्ये एक महिला व बालकाचा समावेश असल्याची खात्रीलायक माहिती मिळते आहे.या संदर्भात लोकमत शी बोलताना पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे म्हणाले की, उजनी पाणलोट क्षेत्रातील कळाशी गावाकडून कुगाव ( ता. करमाळा) कडे निघालेल्या लाँचमधून तीन पुरुष, एक महिला असे चौघेजण प्रवास करत असताना वादळी वाऱ्यामुळे लाँच उलटली.

# दगडफेक अन् खुर्चीफेक, अखिलेश यादवांच्या सभेत उडाला गोंधळ



**आझमगड -** लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान संपलं आहे. सहाव्या टप्प्यातील मतदान २५ मे रोजी होणार आहे. तत्पूर्वी आझमगड जिल्ह्यातील लालगंज लोकसभा मतदारसंघात समाजवादी पक्षाचे उमेदवार प्रसाद सरोज यांच्या समर्थनासाठी सपा अध्यक्ष अखिलेश यादव निवडणूक प्रचाराला आले होते. मात्र अखिलेश यादव यांच्या सभेत मोठ्या प्रमाणात गदारोळ उडाला.

सभेतच दगडफेक आणि एकमेकांवर खुर्च्या फेकण्यात आल्या. या गोंधळात अनेकजण जखमी झाल्याची माहिती आहे. प्रसाद सरोज यांच्या प्रचारासाठी व्यासपीठावर अखिलेश यादव पोहचले तेव्हा समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांची गर्दी नियंत्रणाबाहेर गेली. त्यामुळे कार्यकर्त्यांनी बॅरिकेड्स तोडून अखिलेश यादव यांच्या दिशेने

## पोलिसांचा लाठीचार्ज

धावत आले. यावेळी कार्यकर्त्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्जही केला त्यामुळे लोकांमध्ये गोंधळ उडाला. लोकांनीही दगड आणि खुर्च्या फेकल्या.

या घटनेचा व्हिडिओ समोर आला आहे. त्यात पाहू शकता की, व्यासपीठाच्या दिशेने धावताना कार्यकर्ते एकमेकांना मागे ढकलत आहेत. इतकेच नाही तर कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर चढून धावतायेत. ज्या स्टँडवर लाऊड स्पीकर लावण्यात आले होते तेदेखील खाली पडले. नियंत्रणाबाहेर गेलेल्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला. यावेळी कार्यकर्त्यांनी एकमेकांवरही खुर्च्या फेकल्या. अखिलेश यादव सातत्याने व्यासपीठावरून लोकांना शांत राहण्याचं आवाहन करत होते. परंतु त्याचा कुठलाही परिणाम झाला नाही.

## रविवारीही उडाला गोंधळ

**रविवारीही फुलपूर लोकसभा मतदारसंघातील समाजवादी पक्षाचे उमेदवार अमरनाथ मौर्य यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत अचानक गोंधळ झाला होता. उत्साहाच्या भरात लोकांनी बॅरिकेडस तोडून मंचावर जाण्याचा प्रयत्न केला. फुलपूर मतदारसंघातील पडिला महादेव येथे ही सभा आयोजित केली होती. राहुल व अखिलेश मंचावर आले असताना उत्साहित लोक मंचावर चढले. त्यामुळे मंचावर जागाच शिल्लक राहिली नाही. स्थानिक नेत्यांनी लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले, मात्र कुणीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. लोकांना रोखताना पोलिसांनी कसरत झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिस सौम्य लाठीमार करणार होते, मात्र राहुल व अखिलेश यांनी त्यांना रोखले. पोलिसांनी वेळीच गर्दी नियंत्रित केली असती, तर ही परिस्थिती ओढवली नसती, अशी प्रतिक्रिया समाजवादी पक्षाचे नेते दान बहादूर मधुर यांनी दिली होती.**

रविवारीही फुलपूर येथील अखिलेश यादव आणि राहुल गांधी यांच्या सभेत गर्दी उसळून आली. कार्यकर्त्यांनी बॅरिकेड्स तोडून व्यासपीठाजवळ पोहचले. वारंवार कार्यकर्त्यांना शांतता राखण्याचं आवाहन केले जात होतं. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांनी भाषण आटोपतं घेतले. या घटनेचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# पुणे अपघाताची न्यायिक चौकशी व्हावी

**विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची मागणी**



**मुंबई :** पुण्यात झालेल्या भीषण अपघातात पुणे पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे त्यामुळे या प्रकरणी न्यायिक चौकशी व्हावी अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

वडेट्टीवार आपल्या ट्विट मध्ये म्हणतात की,पुणे अपघातातील आरोपीची अल्कोहोल चाचणी निगेटिव्ह असल्याचा अहवाल पोलिसांनी दिला आहे. अल्पवयीन असलेला आरोपी दारू पित असल्याचे सीसीटिव्ही फुटेज असूनही हा अहवाल आल्याने पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

अल्पवयीन आरोपीला दारू कशी उपलब्ध झाली?रजिस्ट्रेशन नसलेली गाडी पुण्यातील रस्त्यावर कशी आली?नियम डावलून बार आणि पब सुरू होते का? होते तर त्यांच्यावर कारवाई का नाही?या प्रश्नांचा तपास न करता आरोपीला निर्दोष सिद्ध करण्यासाठी जणू पुणे पोलिसांचा तपास असल्याचे चित्र आहे.

वडेट्टीवार यांनी आरोपी अल्पवयीन आहे हे माहीत असताना त्याच्या वडिलांना अटक करण्यात इतका वेळ का लागला? असा प्रश्न उपस्थित करत सदर घटनेची न्यायिक चौकशी व्हावी आणि या प्रकरणात पुणे पोलिसांची सुद्धा चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे.

## संपादकीय

## स्थित्यंतर

# लोकसभेचा कौल कुणाला?

लोकसभा निवडणुकीच्या सात टप्प्यांपैकी पाच टप्प्यातील मतदान पार पडले आहे. शेवटचे दोन टप्पे उरले असले तरी ४ जूनला निकाल लागणार असल्याने आतापासूनच उत्सुकता वाढू लागली आहे. या पाच टप्प्यांवरून 'एनडीए' आणि 'इंडिया' आघाडी दोन्ही विजयाचा दावा प्रतिदावा करीत आहेत. वेगवेगळ्या लोकांचे अंदाज वेगवेगळे असले, तरी भाजपला, जाहीर केल्याप्रमाणे चारशे जागांचा टप्पा गाठणे आणि 'इंडिया' आघाडीला सहज सत्ता मिळणे अवघड आहे, असा आतापर्यंतच्या मतदानाचा अर्थ आहे. पाच टप्प्याचे मतदान पाहता भाजप महायुतीला महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, बिहार आणि हरियाणा, पंजाब, राजस्थान या राज्यांमध्ये काही प्रमाणात राजस्थानमध्ये फटका बसू शकतो.



राही भिडे

छत्तीसगड, आंध्र प्रदेश, ओडिसा आणि काही प्रमाणात दक्षिणेतील राज्यांत फायदा होऊ शकतो असा एकूण रागरंग आहे. देशाच्या उर्वरित भागात स्थिती काही प्रमाणात 'जैसे थे'च राहण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत भाजप ३७० जागा आणि 'एनडीए' ४०० जागा जिंकेल, अशी घोषणा पहिल्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत केली होती. त्यावेळी भाजप आणि 'एनडीए'ला हा आकडा प्रत्यक्षात ओलांडता येतो की नाही, हे ४ जूनलाच कळेल पण निवडणुकीतील जयापजयाचा अंदाज पंतप्रधानांना आला असेलच. त्यामुळेच त्यांनी प्रचाराचा धडाका सुरू केला असावा. भाजपला चारशेचा आकडा का पार करायचा आहे? ही युक्ती विरोधकांना समजल्यावर त्यांनी पलटवार केला की, भाजपला ४०० चा आकडा का पार करायचा आहे? त्यावर संविधान बदलण्यासाठी भाजपला निर्विवाद बहुमत हवे असल्याची चर्चा सुरू झाली. मात्र बहुतांश लोकांसाठी संविधानाचा अर्थ आरक्षण आहे आणि आरक्षण व्यवस्था संपवण्यासाठी भाजपला ४०० पेक्षा जास्त जागा हव्या आहेत, असे सांगितल्यावर भाजपच्या लक्षात आले की, आपली घोषणा आपल्यावरच उलटत आहे. हे फाजील आत्मविश्वासाचे लक्षण उपयोगाचे असू शकत नाही. २०१४ मध्ये देशात मोदी लाट आली होती २०१९ मध्येदेखील याच लाटेवर आरूढ होऊन त्यांनी जनतेला आमिषे दाखवायला सुरूवात केली आणि २०२४ मध्ये पुन्हा लाटेचा प्रयत्न फसला. मोदींची प्रचाराची पातळी खाली गेली, त्यांचा आत्मविश्वास कमी झाला त्यामुळे त्यांना मुंबईवर अधिक लक्ष केंद्रीत करावे लागले. पाचव्या टप्प्याअखेर ५४३ पैकी ४२८ जागांवर मतदान झाल्यानंतर विजय-पराजयाबाबत नवनवीन अंदाज बांधले जात आहेत. भाजपच्या दाव्यांवर विश्वास ठेवला तर तुलनेने भाजप सरकार स्थापनेच्या जवळ आहे असे दिसते, तर भाजप हवेत असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. निवडणुकीतील ग्राउंड रिॲलिटी वेगळी आहे; पण प्रकरण तितकेसे साधे नाही. कारण महागाई, बेरोजगारी, जलसंकट आदी पारंपारिक मुद्दे सोडून मतदारांना जाती धर्माकडे वळविण्याचा प्रयत्न होत आहे. देशात सत्ता परिवर्तनाचा दावा करणारी 'इंडिया' आघाडी ४६६ जागांवर निवडणूक लढवत आहे, तर तिसऱ्यांदा सत्तेत परतण्याचा दावा करणारी भाजपप्रणीत 'एनडीए' आघाडी ५४१ जागांवर निवडणूक लढवत आहे. 'इंडिया' आघाडीमध्येच दोन आघाड्या आहेत. त्यातील एक राष्ट्रीय स्तरावर आणि दुसरी प्रादेशिक स्तरावर आहे. त्यात राज्यवार, प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्ष २३३ जागांवर निवडणूक लढवत आहेत. 'इंडिया' आघाडीतील प्रमुख पक्ष काँग्रेस आहे. तो ३२८ जागांवर लढत आहे, तर 'एनडीए' मधील मुख्य पक्ष भाजप आहे. तो ४४१ जागांवर निवडणूक लढवत आहे. पाचव्या टप्प्यानंतर भाजप आपल्या दाव्यावर ठाम आहे, तर 'इंडिया' आघाडीचे स्वतःच्या विजयापेक्षा भाजपला पराभूत करण्याचे दावे जास्त आहेत. काँग्रेसचे स्टार प्रचारक राहुल गांधी यांनी एकट्या उत्तर प्रदेशात 'इंडिया' आघाडी ५० हून अधिक जागा जिंकेल, असा दावा केला, तर समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी 'राजकीय विनोद' शैलीत दावा केला की उत्तर प्रदेशात 'इंडिया' आघाडी ८० पैकी ७९ जागा जिंकेल. फक्त एक जागा वाराणसी त्यांनी भाजपला सोडली की काय असा प्रश्न पडतो. देशातील १४० कोटी जनता भाजपच्या १४० जागा कमी करेल असे ते म्हणतात. मोदी यांच्या ३७० जागा जिंकण्याच्या दाव्याला अखिलेश यांनी दिलेले हे उत्तर असावे. सर्वात आश्चर्यकारक दावा बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा होता. एका सभेत मंचावरून त्यांनी 'एनडीए' ला आधी चार लाख, नंतर चार हजार आणि नंतर चारशे जागा जिंकणार असल्याचा दावा केला होता. लोकांनी त्याकडे दुर्लक्ष केले. चौथ्या टप्प्यातील मतदानापूर्वी तुरुंगातून सुटलेल्या अरविंद केजरीवाल यांनी लोकसभा निवडणुकीनंतर मोदी पंतप्रधानपदी राहणार नाहीत, असा 'फॉर्म्युला बॉम्ब' भाजपवर फोडला. त्याचे कारण म्हणजे पक्षातील इतर काही नेत्यांना दूर सारण्यासाठी मागील निवडणुकीत पंतप्रधान अमित शाह असतील, असा दावाही केजरीवाल यांनी केला. केजरीवाल यांना ही माहिती कुठून मिळाली हे माहीत नाही; पण या दाव्यामुळे भाजपमध्ये घबराट निर्माण झाली आहे. तथाकथित अघोषित फॉर्म्युला मोदींना लागू होत नसल्याचे सांगत शाह यांनी लगेचच त्याचे खंडन केले. म्हणजे जागा जिंकण्याची ही एक नवीन युक्ती आहे. या दाव्यामुळे विरोधकांपेक्षा भाजप नेत्यांमध्ये अधिक तणाव निर्माण झाला. जागा जिंकण्यासाठी दोन्ही आघाड्यांची सत्यता तपासली तर 'एनडीए' आघाडी यावेळी बॅकफूटवर दिसत आहे. २९० जागा मिळतील की नाही अशी शंका व्यक्त केली जात आहे, भाजपकडे मतदानाची आणि निकालांचे मूल्यांकन करण्याची स्वतःची अंतर्गत आणि मजबूत यंत्रणा आहे. ती पक्षश्रेष्ठींना अहवाल देते. यावेळचे मतदान तुलनेने कमी झाले असले, तरी बहुतांशी मते भाजपलाच पडली आहेत, असा विश्वास या पक्षाला आहे. अशा स्थितीत विजयाचे अंतर कमी होऊ शकते; इंडिया' आघाडीत निकालाचा अंदाज लावण्यासाठी कोणतीही ठोस यंत्रणा नाही.

संभाव्य परिणामांचे मूल्यांकन कार्यकर्ते आणि पोलिंग एजंट्सची माहिती, प्रचार सभेतील गर्दी आणि राजकीय महत्त्वाकांक्षा इत्यादींच्या आधारावर केले जाते. या निवडणुकीचे दोन टप्पे अद्याप बाकी आहेत; पण देशात नवे सरकार कोण बनवणार हे मुख्यत्वे उत्तर प्रदेशातील जागांच्या विजयावर ठरेल. उत्तर प्रदेशात लोकसभेच्या सर्वाधिक ८० जागा आहेत. पंतप्रधानपदाचे दोन दावेदार आणि सध्याचे पंतप्रधानही याच राज्यातून निवडणूक लढवत आहेत. उत्तर प्रदेश राज्यातील सत्ताधारी भाजप (एनडीए (आघाडी) च्या एकूण मतांची टक्केवारी गेल्या लोकसभा निवडणुकीत सुमारे ५४ टक्के होती, तर 'इंडिया' आघाडीच्या मतांची टक्केवारी केवळ २३ टक्के आहे. आणखी एक मोठा पक्ष बसप आहे. त्याला १९.४३ टक्के मते होती. तो कोणत्याही युतीचा भाग नाही. बसप प्रमुख मायावती यांच्या सर्व निवडणुकीतील चालींचा भाजपला अधिक फायदा होताना दिसत आहे; पण तीही दुधारी तलवार आहे. या वेळी मायावतींनी लोकसभा निवडणुकीत २३ मुस्लिम आणि १४ ब्राह्मणांना तिकीट दिले आहे. हे उमेदवार स्वतः जिंकू शकत नाहीत, पण ते कोणालाही पराभवाच्या खाईत ढकलू शकतात.

# आझम कॅम्पसच्या शाळांचे १२ वी च्या परिक्षेत घवघवीत यश




**पुणे :** महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या आबेदा इनामदार ज्युनिअर कॉलेज फॉर गर्ल्स,अँग्लो उर्दू बॉईज स्कूल, एम.सी.इ.एस. इंग्लिश मिडीयम स्कुल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बारावीच्या परिक्षेत घवघवीत यश मिळवले.

आबेदा इनामदार ज्युनिअर कॉलेज च्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.६३ टक्के इतका लागला. कला शाखेचा निकाल १०० टक्के,तर वाणिज्य शाखेचा निकाल ९८.५५ टक्के इतका लागला. व्होकेशनल शाखेचा निकाल ९५.५२ टक्के लागला. विज्ञान शाखेतून ८४.८३ टक्के गुण मिळवून सारा अयाझ मेमन प्रथम आली . कला शाखेत ९४.६७ गुण मिळवून झोया मतीन खान प्रथम आली तर कॉमर्स विभागात जसलीन कौर सतींदर सिंग पराशर ला ९०.३३ टक्के गुण मिळाले आणि प्रथम आली . प्राचार्य रोशन आरा शेख यांनी अभिनंदन केले.

अँग्लो उर्दू बॉईज् स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा एकूण निकाल ९२.७९ टक्के लागला. विज्ञान शाखेचा निकाल ९६.०२ टक्के, वाणिज्य शाखेचा ९७.८२ टक्के तर कला शाखेचा ५३.४४ टक्के निकाल लागला. मुख्याध्यापक राज मुजावर यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले. जामदार जिब्रान जावेद हा विद्यार्थी ९४.१७ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रथम आला. कॉमर्स विभागात पठाण मुसाब आरिफ हा विद्यार्थी ७९ टक्के मिळवून प्रथम आला तर शेख हाफसा असगर ही विद्यार्थीनी ८०.३३ टक्के गुण मिळवून कला शाखेत प्रथम आली.

एम.सी.इ.एस. इंग्लिश मिडीयम स्कुल अँड ज्युनियर कॉलेजचा निकाल ९१. ८२ टक्के लागला. विज्ञान शाखेचा निकाल ९८. ७१ टक्के इतका लागला. कला शाखेचा निकाल ७२ टक्के, तर वाणिज्य शाखेचा निकाल ९७.५० टक्के इतका लागला. मेमन झारहान झाहीद हा विद्यार्थी ८०.३३ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रथम आला. कॉमर्स विभागात बांगी युसूफ काझी हा विद्यार्थी ८३.५० टक्के मिळवून प्रथम आला तर शेख झोया झाकीर टक्के गुण मिळवून ७५.५ कला शाखेत प्रथम आली. मुख्याध्यापक सौ. अस्फिया अन्सारी यांनी अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ .पी ए इनामदार ,उपाध्यक्ष आबेदा इनामदार ,सचिव प्रा. इरफान शेख यांनी तिन्ही विद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ज्ञानेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय मांडवाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**पिंपरी चिंचवड :** ज्ञानेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय मांडवा या विद्यालयाचा फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या वर्ग बारावीच्या परीक्षेचा उत्कृष्ट निकाल लागला असून यामध्ये विज्ञान शाखेमधून १८९ पैकी १८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले विज्ञान शाखेचा निकाल ९८.४१ टक्के तर कला शाखेतून ५५ पैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले या शाखेचा निकाल ९२.७२ टक्के लागला विज्ञान शाखेतून ५५३ गुण् सह पुनम ज्ञानेश्वर हराळ प्रथम आली तिला ९२.१७% गुण मिळाले तर ५२९ गुन्हा सह ऋतुजा विष्णू जायभाये द्वितीय आली तिला ८८.१७ टक्के गुण मिळाले तर ५२५ गुन्हा सह कु. वैष्णवी भागवत घुगे ही तृतीय आली असून तिला ८७.५० टक्के गुण मिळाले आहेत

विज्ञान शाखेतून ७५ टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर प्रथम श्रेणीमध्ये ११७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर द्वितीय श्रेणीमध्ये ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

कला शाखेतून ४४४ गुण घेऊन धीरज गजानन राठोड प्रथम आला त्याला ७४ टक्के गुण मिळाले तर ४३२ गुणासह कुमारी राणी गजानन सानप द्वितीय आली आहे तिला ७२ टक्के गुण मिळाले तर रोहन अशोक वाकळे ४३१ गुन्हा संह तृतीय आला आहे त्याला ७१.८३ टक्के गुण मिळाले आहेत

कला शाखेतून प्रथम श्रेणीमध्ये ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर द्वितीय श्रेणीमध्ये १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे सचिव लक्ष्मणरावजी कायंदे व अध्यक्ष अविनाशजी कायंदे यांनी शुभेच्छा दिल्या तर प्राचार्य भागवत घुगे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना दिले कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# अलार्ड पब्लिक स्कूलचा दहावीसह बारावीचा निकाल १०० टक्के



**पुणे :** अलार्ड चॅरिटेबल ट्रस्टच्या हिंजवडीच्या मारुंजी येथील अलार्ड पब्लिक स्कूल च्या (सी.बी.एस.ई) दहावी आणि बारावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. विद्यालयाने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. दहावीच्या परीक्षेत धीमण सिंग ९४.०० प्रथम क्रमांक, गिरीजा अडसूळ ८७.४ द्वितीय क्रमांक आणि अर्णव झा ८६.२ तृतीय क्रमांक मिळविला आहे.

बारावीच्या परीक्षेत अद्विका बदकश ९६.६ टक्के प्रथम क्रमांक, अभिजित प्रसाद ९५.२ द्वितिय क्रमांक, शाश्वती शर्मा ९२.८ टक्के तृतिय क्रमांक, सिद्धेश माचवे ९२.४ टक्के चतुर्थ क्रमांक, हर्षिनी डेरे ९२.२ टक्के पाचवा क्रमांक आणि आर्या अग्रवाल ९०.८ टक्के, ऋतविक शर्मा ९०.२ टक्के संपादन केले आहे. तसेच, एकूण ३९ विद्यार्थ्यांपैकी ६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण संपादन केले आहे.

या स्कूलच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार अलार्ड चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एल.आर.यादव, अलार्ड स्कूलच्या संचालिका ज्योत्स्ना मिश्रा आणि प्रिन्सिपल शुभ्रा श्रीवास्तव यांनी केला. या प्रसंगी डॉ.एल.आर.यादव म्हणाले, अलार्ड पब्लिक स्कूलने यशाची १० वर्षे साजरी केली आहेत. विद्यार्थी आणि शिक्षकांच्या कठोर परिश्रम आणि प्रतिभेमुळे स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे.

## पुढील तीन दिवस मराठवाड्यात वादळी वाऱ्याच्या पावसाची शक्यता

राज्यात विविध ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून मराठवाड्यात पुढील तीन दिवस ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मराठवाडयात पुढील तीन दिवस दूपारच्या वेळी आकाश अंशत: ढगाळ राहून तूरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक २१ मे रोजी जालना, लातूर, परभणी, हिंगोली, धाराशिव व बीड जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ४० ते ५० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

दिनांक २२ मे रोजी नांदेड, लातूर, धाराशिव, परभणी व हिंगोली जिल्हयात व दिनांक २३ मे रोजी नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.



# कोल्हापूरला पावसाने झोडपले; झाड मोटारीवर कोसळले

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहर, पन्हाळा तालुक्यासह जिल्ह्यातील विविध भागांत पावसाने सोमवारी अक्षरशः झोडपून काढले. जोतिबा रोड परिसरात तासांहून अधिक काळ धगफुटीसदृश्य पाऊस सुरू होता. याच भागात झाड मोटारीवर कोसळले. त्यामध्ये काही प्रवाशी अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अलीकडे कोल्हापुरात उष्मा वाढला होता. मोठ्या पावसाची अपेक्षा केली जात होती. दुपारनंतर वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. कोल्हापूर शहर, करवीर, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ तालुक्यात मुसळधार पाऊस तासभर झाल्याचे स्थानिक नागरिकांतून बोलले जात आहे. तर अनेक भागात ढगफुटीसदृश्य पाऊस झाला.

कोल्हापूर शहराच्या सखल भागात पाणी साचल्याने लोकांची त्रेधातीरपिट उडाली. पन्हाळागडावर जाणाऱ्या रोडवर झाड मोटारीवर कोसळले. विविध ठिकाणी झाडे कोसळली. तसेच वीजपुरवठासुद्धा काही काळ खंडित झाला होता. कसबा बावडा वडणगे रस्त्यावर झाडांसह लाईटचे पोल पडले. वडणगे स्मशानभूमीचे छत वादळाने पडले.

# महर्षि च्यवन महाराज जीवन गौरव पुरस्काराने रवी बोडके सन्मानित

**आसनगाव :** करंजखोप (ता. कोरेगाव) ग्रामस्थांच्यावतीने आयोजित ग्रंथराज श्री ज्ञानेश्वर सामुदायिक पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमात यशोधन ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष रवी बोडके व सौ. बोडके यांना महर्षि च्यवन महाराज जीवन गौरव पुरस्कार देवून आ. दीपक चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.ग्रामस्थ मंडळ करंजखोप यांच्यावतीने गेल्या १६ वर्षांपासून ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा व अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. या सप्ताहात दरवर्षी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना महर्षि च्यवन महाराज जीवन गौरव पुरस्कार देवून गौरवण्यात येते.



**करंजखोप - रवी बोडके व सौ. बोडके यांना पुरस्काराचे वितरण करताना आ. दीपक चव्हाण शेजारी योगेश महाराज यादव, कैलास धुमाळ, भूषण पवार, संदीप धुमाळ व इतर.(छाया: शुभम**

खा. श्रीनिवास पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे ना. निंबाळकर, पाणी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. अविनाश पोळ, आ. मकरंद पाटील यांना आत्तापर्यंत या पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे. यावर्षी या पुरस्कारासाठी वेळे (ता. वाइ) येथील यशोधन ट्रस्टचे अध्यक्ष रवी बोडके व सौ. बोडके यांची निवड करण्यात आली.

आ. दीपक चव्हाण यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी योगेश महाराज यादव, कैलास धुमाळ, भूषण पवार, संदीप धुमाळ, उपसरपंच सुरज शिंदे आदी उपस्थित होते. अनाथ लोकांसाठी व वेड्यांसाठी काम करणारा एक अवलिया, ज्या माणसाने १८ वर्षांपूर्वी फलटण येथील स्वतःची २ एकर शेती विकून येणारी सर्व रक्कम या कार्यास वाहून, यशोधन ट्रस्ट वेळे या नावाने आश्रम स्थापन केला.

आजपर्यंत ७०० अनाथांना पुर्णपणे बरे करून त्यांचा पत्ता शोधून त्यांना स्वगृही परत पाठवले. अनेक अनाथ वृद्धांचा सांभाळ करून त्यांना चांगले जीवन दिले अशा रवी बोडके आणि त्यांच्या सुविद्य पत्नी यांना या वर्षीच्या पुरस्कार दिल्याबद्दल आ. दीपक चव्हाण यांनी समाधान व्यक्त केले.

# बी-बियाणे, खते विषयक तक्रारींसाठी भरारी पथके

## तालुका कृषी अधिकारी संजीवन गायकवाड यांनी दिली महिती

**भोर :** खरीप हंगामात भोर तालुक्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार निविष्ठांचा वेळेत व वाजवी दरात पुरवठा व्हावा, तसेच याबाबतच्या तक्रारींचे त्वरित निराकरण होण्यासाठी कृषी विभागाकडून तालुका पातळीवर भरारी पथक स्थापन केले असल्याची माहिती पथक प्रमुख तथा तालुका कृषी अधिकारी संजीवन गायकवाड व सदस्य सचिव तथा पंचायत समितीचे कृषी अधिकारी शिवराज पाटील यांनी दिली.

पाच सदस्यीय भरारी पथकात वजन माप निरीक्षक,मंडळ कृषि अधिकारी भोर-१, भोर-२ व नसरापूर तसेच तालुका कृषि अधिकारी भोर कार्यालयातील कृषी अधिकारी यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांनी खते, बी बियाणे खरेदी करताना पक्की पावती घ्यावी. तसेच खते, बी बियाणे याविषयीच्या असणाऱ्या तक्रारींसाठी कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. भोर तालुक्यात कृषी सेवा केंद्रे, खते, बी बियाणे औषधे व कीटकनाशक विक्रेत्यांची संख्या ४६ इतकी आहे. दुकानदारांना पॉस मशिनद्वारे खते विक्री करण्याची सूचना दिली गेली आहे.

पथकामार्फत निकृष्ट दर्जाचे व वाढीव दराने खते विक्री करणाऱ्या दुकानदारांवर लक्ष ठेवण्यात येणार असून खत देण्यास टाळाटाळ करणाऱ्या, जादा दर मागणाऱ्या तसेच पक्की पावती न देणाऱ्या विक्रेत्यावर कारवाई करण्यात येणार आहे. पथकाच्या माध्यमातून दुकानांची तपासणी, शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार दोषींवर कारवाई करण्यात येईल.

दोषी दुकानदाराचा परवाना रद्द करणे, फसवणुकीचा गुन्हा दाखल करणे आदी स्वरूपाची कठोर करवाई करण्यात येणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी संजीवन गायकवाड यांनी सांगितले.

खते, बियाणांच्या नियोजनापासून शेतकरी अभितज्ञ मात्र भरारी पथके स्थापन करण्यात आल्याने शेतकऱ्यांत समाधान...

खरीप हंगामाची तालुकास्तरीय हंगाम पूर्व व नियोजन बैठक तहसीलदार सचिन पाटील यांच्या अध्यक्षते खाली २२ एप्रिल रोजी पंचायत समितीच्या सभागृहात पार पडली दरम्यान आचार संहिता लागू असल्याने सभेसाठी मोजकेच अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे शेतकरी बी-बियाणे, खते, औषधे, कीटकनाशके , तणनाशके यांच्या माहितीपासून व नियोजनापासून अभितज्ञ राहीले असल्याने शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त केली असली तरी भरारी पथक स्थापन करण्यात आल्याने समाधान व्यक्त होत आहे.

# वादळी वाऱ्यामुळे पुण्यात ३७२ झाडे कोसळली

## वाहतूक कोंडीचा नागरिकांना त्रास

**पुणे :** गेल्या २० दिवसांमध्ये पुणे शहरात वादळी पावसामुळे तब्बल ३७२ झाडे पडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामध्ये जीवितहानी झाली नाही हे सुदैवी आहे, पण अनेक वाहनांचे नुकसान झाले आणि रस्ते बंद होऊन वाहतूक कोंडीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागला.

यंदा मॉन्सूनपूर्व पावसाने पुण्याला चांगलेच झोडपले आहे. दुपारी कडक ऊन आणि सायंकाळी वादळी पाऊस यामुळे शहरातील झाडे पडली. अनेक झाडे रस्त्यालगतची आहेत, जी रस्त्यात पडली आणि त्यामुळे शहरात प्रचंड कोंडी झाली. हाच अनुभव सोमवारी (दि.२०) पुणेकरांनी वानवडी, घोरपडी, सोलापूर रोडवर नागरिकांना मिळाला. सायंकाळनंतर दोन तीन तास वाहतूक कोंडी झाली होती. एम्प्रेस गार्डन येथे भले मोठे झाड पडल्याने रस्ता ब्लॉक झाला. परिणामी सर्वत्र कोंडी झाली.

येत्या दोन तीन दिवस दररोज सायंकाळी वादळी पाऊस येणार आहे, त्यामुळे नागरिकांनी सायंकाळी घराबाहेर पडू नये, अन्यथा कोंडीत अडकण्याची भीती आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

## अहमदनगर जिल्ह्याचा बारावीचा निकाल ९३.४० टक्के

**अहमदनगर :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत यंदा नगर जिल्ह्याचा निकाल ९३.४० टक्के लागला आहे. मागील वर्षीपेक्षा निकालात १.४० टक्के वाढ झाली असून मुलांपेक्षा मुलींचा निकाल अधिक असल्याची परंपरा याहीवर्षी कायम आहे.

मंडळातर्फे बारावीचा निकाल मंगळवारी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात आला. यावर्षी बारावीची परीक्षा ३५ हजार ३५५ मुले व २६ हजार ६११ मुली अशा एकूण ६१ हजार ९६६ विद्यार्थ्यांनी दिली. त्यातून ३२ हजार २०२ मुले (९१.०८ टक्के) व २५ हजार ६७५ मुली (९६.४८ टक्के) असे एकूण ५७ हजार ८७७ विद्यार्थी (९३.४० टक्के) उत्तीर्ण झाले. यंदा पुणे विभागात नगर तिसऱ्या स्थानी फेकले गेले आहे.

# बारावीच्या परीक्षेत अकोल्यातही यंदा मुलीच!



**अकोला :** राज्य शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता बारावीचा निकाल २१ मे रोजी दुपारी १ वाजता जाहीर करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही बारावीच्या परीक्षेच्या निकालामध्ये जिल्ह्यात मुलांच्या तुलनेत मुलीच वरचढ ठरल्या आहेत. अकोला जिल्ह्याचा एकूण निकाल ९२.०२ टक्के लागला असून, यात मुलींच्या टक्केवारीत गतवर्षीच्या ९४.७० टक्क्यांच्या तुलनेत ९४.८३ टक्के किंचित वाढ झाली आहे.

जिल्ह्यात बारावी परीक्षेसाठी १३ हजार ८७९ मुले, १२ हजार ८६ मुली अशा एकूण २५ हजार ९६५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १३ हजार ८२६ मुले व १२ हजार २५ मुली अशा एकूण २५ हजार ८५१ विद्यार्थ्यांनी ८७ केंद्रांवरून परीक्षा दिली होती. एकंदरीतच बारावी परीक्षेचा जिल्ह्याचा निकाल घवघवीत लागला आहे. या निकालामध्ये मुलांच्या तुलनेत मुलींनी अपेक्षेनुसार यंदाही आघाडी मिळविली आहे.

**असा लागला निकाल**

| तालुका | मुले | मुली | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अकोला | ४४७४ | ४७५३ | ८९.६१ |
| अकोट | १४६७ | १४५० | ९०.५६ |
| तेल्हारा | ८९० | ८७० | ९४.७२ |
| बार्शीटाकळी | १६४८ | ११७७ | ९३.६० |
| बाळापूर | १३५९ | १२१० | ९४.८३ |
| पातूर | १५३२ | १०५७ | ९५.११ |
| मूर्तिजापूर | १०५० | ८५२ | ९३.८३ |

जिल्ह्यातील सातही तालुक्यांमध्ये मुलींच्या निकालाची टक्केवारी मुलांपेक्षा सरस आहे. बारावीच्या परीक्षेत १२ हजार ४२० मुले, तर ११ हजार ३६९ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. जिल्ह्यात विज्ञान शाखेचा दरवर्षीप्रमाणे भरघोस निकाल लागला असून, विज्ञान शाखेचे ९७.६४ टक्के विद्यार्थी पास झाले. त्या खालोखाल वाणिज्य शाखेचा ९३.३३ टक्के, कला शाखेचा निकाल ८७.६८ टक्के, तर व्होकेशनल शाखेचा निकाल ८०.४०२ टक्के लागला आहे. जिल्ह्यातील सर्वच महाविद्यालयांचा निकाल उत्कृष्ट लागला असून, गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# ठाणे जिल्ह्याचा बारावीचा निकाल ९२.०८ %

**ठाणे :** उच्च माध्यमिक म्हणजेच बारावीचा निकाल मंगळवारी जाहीर झाला असून ठाणे जिल्ह्यात यंदा ९२. ०८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा निकाल हा कमी लागला असला तरी, यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. जिल्ह्यात ९४.०७ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. तर, यंदा विज्ञान शाखेचा सर्वाधिक म्हणजेच ९७.०५ टक्के निकाल लागला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सन २०२३ -२४ चा इयत्ता बारावीचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. यंदा ठाणे जिल्हाचा निकाल ९२.०८ टक्के लागला असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी दिली. यंदाच्या वर्षी ठाणे जिल्ह्यातून बारावीच्या परिक्षेला एकूण ९७ हजार ६६२ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यापैकी ८९ हजार ९३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्यातील उत्तीर्ण झालेल्या ८९ हजार ९३५ विद्यार्थ्यांमध्ये ४५ हजार ६५५ मुले आणि ४४ हजार २८० मुलींचा समावेश आहे. यंदाच्या वर्षी जिल्ह्यात ग्रामीण भागातील मुरबाड तालुक्याचा निकाल सर्वाधिक लागला असून याठिकाणी ९८.०१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण आहे. मुरबाड तालुक्यातील १ हजार ९६५ विद्यार्थ्यांनी बारावीची परिक्षा दिली होती. यापैकी १ हजार ९२६ विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ९३९ मुलांचा तर, ९८७ मुलींचा समावेश आहे.

विज्ञान शाखेचा सर्वाधिक निकाल यंदा जिल्ह्यात विज्ञान शाखेचा सर्वाधिक म्हणजेच ९७.०५ टक्के निकाल लागला आहे. या शाखेतून ३९ हजार ३१ विद्यार्थ्यांपैकी ३७ हजार ८८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा निकाल ९१.३४ टक्के लागला असून या शाखेतून ४५ हजार ११९ विद्यार्थ्यांपैकी ४१ हजार २१६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर, कला शाखेचा निकाल ७९.३९ टक्के लागला आहे. या शाखेतून १२ हजार ६६३ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यापैकी १० हजार ५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचा निकाल ९३.६६ टक्के लागला आहे. या अभ्यासक्रमाची परिक्षा ५६८ विद्यार्थ्यांनी दिली होती. त्यापैकी ५३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यासह, तंत्रज्ञान विज्ञान शाखेचा अभ्यासक्रमाचा निकाल ८९.६७ टक्के लागला असून या अभ्यासक्रमाच्या परिक्षेला २८१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## रायगडावर ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा थाटामाटात होणार

**कोल्हापूर :** रायगडावर ५ व ६ जूनला ३५० वा शिवराज्याभिषेकाचा सोहळा 'लोकोत्सव' म्हणून मोठ्या थाटामाटात साजरा करण्यासाठी शिवभक्तांनी स्वयंशिस्तीची वज्रमूठ बांधत सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी येथे केले.

पुणे येथील ऑल इंडिया श्री छत्रपती शिवाजी मेमोरियल सोसायटीमध्ये आयोजित शिवराज्याभिषेकाच्या पूर्व नियोजनाच्या राज्यव्यापी बैठकीत ते बोलत होते. युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती व शहाजीराजे छत्रपती प्रमुख उपस्थित होते.संभाजीराजे म्हणाले, 'शिवराज्याभिषेकास यंदा ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. गतवर्षीपेक्षा यंदा गर्दीचा उच्चांक होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिवभक्तांनी स्वयंशिस्त पाळून गडावर यावे. समितीतर्फे गडावर येणाऱ्या शिवभक्तांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. शिवराज्याभिषेक लोकोत्सव झाला असून, राज्यातील विविध जिल्ह्यांतून शिवभक्तांचा गडावर ओघ वाढत आहे. देशाच्या अन्य राज्यांतून शिवभक्त गडावर दाखल होत आहेत. नेहमीप्रमाणे यंदाचाही शिवराज्याभिषेक सोहळा थाटामाटात आणि अविस्मरणीय होईल.'

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले उत्तर भारत दौऱ्यावर

**मुंबई-** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे आज लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी उत्तर भारत दौऱ्यावर रवाना झाल आहेत.राष्ट्रीय लोकशाही आघाडी(एनडीए) चे रामदास आठवले हे राष्ट्रीय स्तरावर स्टार प्रचारक आहेत.मुंबईतुन आज त्यांनी दिल्ली ला प्रयाण केले.

दिल्ली येथून आज दुपारी हरियाणाच्या सोनीपथ,कर्नाल आणि अंबाला या लोकसभा मतदार संघात भाजप उमेदवारांचा प्रचार ना. रामदास आठवले करणार आहेत. कर्नाल येथे भाजपचे हरियाणा चे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर लोकसभा निवडणुक लढत आहेत.त्यांच्या प्रचारासाठी ना.रामदास आठवले कर्नाल येथे उपस्थित राहणार आहेत. दि.२२ मे रोजी ना.रामदास आठवले उत्तर प्रदेश मधील विविध लोकसभा मतदार संघात भाजप उमेदवारांचा प्रचार करणार आहेत.दि.२२ रोजी जौनपुर येथे भाजप उमेदवार कृपाशंकर सिंग यांच्या प्रचारासाठी ना.रामदास आठवले जौनपुर येथे रोड शो आणि जाहिर सभांना संबोधित करणार आहेत.दि.२२ आणि २३ मे रोजी ना.रामदास आठवले जौनपुर,वाराणसी,सारनाथ या ठिकाणी ते भेटी देणार आहेत. वाराणसी लोकसभा मतदार संघात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी निवडणुक लढत आहेत. दि.२५ मे रोजी ना.रामदास आठवले पंजाब राज्यात भाजप एनडीए उमेदवारांचा प्रचार कारणार आहेत.

दि.२७ मे रोजी ना.रामदास आठवले हे सुप्रसिध्द अभिनेत्री कंगणा राणावत या भाजप तर्फे निवडणुक लढत असलेल्या हिमाचल प्रदेशातील मंडी लोकसभा मतदार संघात प्रचार सभांना संबोधित करणार आहेत. दरम्यान दि.२३ मे रोजी महाकारुणी तथागत भगवान गौतम बुध्द यांची २५८६वी जयंती बुध्द पौर्णिमा सारनाथ येथील प्राचीन धम्मेक स्तुप येथे साजरी करण्यात येणार आहे.बुध्द जयंतीचा मंगल उत्सव सारनाथ येथे ना.रामदास आठवले साजरा करणार आहेत अशी माहिती रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे.

# शिरोळ शहरात तीनपानी जुगार जोमात

**शिरोळ :** शिरोळ हे तालुक्याचे ठिकाण असल्याने दररोज तालुक्यातील अनेक ग्रामस्थ या - ना त्या कामासाठी शिरोळ शहरात दाखल होतात. याचाच फायदा अवैध व्यवसायिकांनी घेतला असून जुगार आणि अवैध दारूची विक्री शहरात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. पोलिसांनी मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने या अवैध व्यवसायावर वचक कोण ठेवणार ? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

शिरोळ पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर तसेच नृसिंहवाडी व अर्जुनवाडरोड लगत असणाऱ्या पत्र्याच्या खोलीत तीन पाणी जुगार मोठ्या प्रमाणात सुरु असून शिरोळ पोलिसांच्या दुर्लक्षामुळे हे अवैध व्यवसाय मोठ्या जोमाने सुरू आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय सुरू असताना देखील शिरोळ पोलीस ठाणे कारवाई का करत नाही ? असा सवाल शिरोळ शहरातील सर्व सामान्य नागरिकांतून विचारला जात आहे.

# नारायणगावचे गुरुवर्य सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय उत्तर पुणे जिल्ह्यात अव्वल

**नारायणगाव :-** इयत्ता १२ वी चा आज २१ मे रोजी निकाल जाहीर झाला. यामध्ये ग्रामोन्नती मंडळाचे गुरुवर्य रा.प. सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, नारायणगाव हे उत्तर पुणे जिल्ह्यात अव्वल ठरले आहे. यावर्षीही महाविद्यालयाच्या उज्वल परंपरेला साजेसा निकाल लागला असून कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक शाखांतील विद्यार्थ्यांनी उज्वल यशावर आपले नाव कोरले आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचे बोर्ड परीक्षेत एकूण ८८३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते यापैकी ८४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९५.५८ टक्के लागला.

विज्ञान शाखा ९९.१४%, वाणिज्य शाखा ९६.७६%, कला शाखा ७६.८५%, व व्यावसायिक विभाग ८४.४४ % निकाल लागला.



विज्ञान विभागामध्ये प्रथम क्रमांक कु. वर्पे ज्ञानेश्वरी योगेश ९२.०० %, द्वितीय क्रमांक यहळे प्रणव काळूराम ८९.६७ %, तृतीय क्रमांक कु. बटवाल सानिका शामराव ८९.००%, वाणिज्य विभागामध्ये प्रथम क्रमांक चव्हाण प्रज्वल संदीप ९३.८३%, द्वितीय क्रमांक कु. मुथ्था पलक निर्मल ९३.३३%, तृतीय क्रमांक भुजबळ श्रेयस भागेश्वर ९१.३३%, कला विभागामध्ये कु. क्षीरसागर मोनिका सूर्यकांत ७८.५०%, द्वितीय क्रमांक दुधाणे सुजित शेखर ७८.३३%, तृतीय क्रमांक काळे तन्मय रामदास ७५.३३ % तसेच व्यावसायिक विभागामध्ये कु. डिसोजा रोजी जॉन ६९.३३% द्वितीय क्रमांक पाबळे गिरीश नितीन ६८.८३%, तृतीय क्रमांक कु. गायकवाड दीपाली कैलास ६७.५०% मिळवला.

या निकालाची उल्लेखनीय बाब म्हणजे विज्ञान शाखेत ४३ विद्यार्थी विशेष प्राविण्याने व १७५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. तसेच कु. बटवाल सानिका शामराव, कु. डोंगरे पायल दीपक या विद्यार्थिनींनी माहिती तंत्रज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले व ढोले आर्यन अमोल या विद्यार्थ्यांने कृषी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. त्याचबरोबर बुक कीपिंग अँड अकाउंटन्सी, कृषी विज्ञान व तंत्रज्ञान त्याचबरोबर माहिती तंत्रज्ञान या विषयांत ८ विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९९ गुण मिळवले.

सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर, अध्यक्ष प्रकाशमामा पाटे, कार्यवाह रविंद्र पारगावकर, सर्व संचालक मंडळ, विद्यामंदिराचे मुख्याध्यापक सतीशसिंह तंवर, उपप्राचार्य हनुमंत काळे, पर्यवेक्षक संजय वलटे यांनी अभिनंदन केले.

# पालिका हद्दीतील धोकादायक होर्डिंग हटवा

## मुख्याधिकाऱ्यांचा आदेश : घाटकोपर दुर्घटनेनंतर प्रशासन सतर्क

**सातारा :** घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर सातारा पालिका प्रशासन सतर्क झाले असून, शहरातील सर्व होर्डिंगधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. शिवाय पालिकेच्या जागेत धोकादायक पद्धतीने उभी असलेली सर्व होर्डिंग तातडीने काढण्यात यावीत, असे आदेश प्रशासक तथा मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी अतिक्रमण निर्मूलन विभागाला दिले आहेत.

मुंबईतील घाटकोपर येथे दि. १३ मेरोजी एका पेट्रोल पंपाजवळ महाकाय होर्डिंग कोसळून १६ जणांना आपला जीव गमवावा लागला तर ७५ हून अधिक नागरिक गंभीर जखमी झाले. या घटनेनंतर राज्यातील होर्डिंगचा प्रश्न सर्वाधिक चर्चेचा ठरला. सातारा पालिका प्रशासनानेदेखील घाटकोपर घटनेची गांभीर्याने दखल घेत शहरात ४१ होर्डिंग व्यावसायिकांना तातडीने नोटीस बजावून संबंधित मिळकत व होर्डिंगचा स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. पालिकेकडे नोंद असलेल्या या ४१ व्यावसायिकांनी पालिकेच्या व खासगी जागेवर एकूण ३०० होर्डिंग उभारले आहेत. काही होर्डिंग आबालवृद्धांनी गजबजणाऱ्या उद्यानांजवळ लावण्यात आले असून, असे धोकादायक होर्डिंग तातडीने उतरविण्याचे आदेश मुख्याधिकारी बापट यांनी पालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाला दिले आहे. राजवाडा परिसरात असलेल्या प्रतापसिंह उद्यानापासून होर्डिंग उतरविण्याची मोहीम सुरू करणार असल्याची माहिती अतिक्रमण निर्मूलन विभाग प्रमुख प्रशांत निकम यांनी दिली.

### होर्डिंगधारकांनी मागितली मुदत

**घाटकोपर दुर्घटनेनंतर पालिकेकडून तातडीने शहरातील होर्डिंगधारकांना नोटीस बजावण्यात आली. होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करून त्याचा अहवाल तीन दिवसांत पालिकेत सादर करण्याचे स्पष्ट आदेश त्यांना देण्यात आले. मात्र, हा कालावधी पुरेसा नसून पालिकेने स्ट्रक्चरल ऑडिटसाठी किमान सात दिवसांची मुदत द्यावी, अशी मागणी होर्डिंगधारकांनी पालिकेकडे केली आहे.**

## तापमान ३४ अंश, मात्र उकाडा खुप; विजेची मागणी पोहोचली ४ हजार मेगावॉटवर

**मुंबई :** मुंबईचे कमाल तापमान ३४ ते ३५ अंशावर स्थिर राहत असले तरी आर्द्रता खुप नोंदविण्यात येत आहे. त्यामुळे ऊकाड्यात वाढ होत असून, मुंबईकर घामाच्या धारांनी त्रस्त झाले आहेत. या वाढत्या ऊकाड्यापासून सुटका करण्यासाठी दिवसरात्र एसी, पंखे आणि कुलर चालविले जात आहेत. त्यामुळे मुंबईच्या विजेच्या मागणीत वाढ होत असून, मंगळवारी मुंबईत विजेची मागणी ४ हजार ३०७ मेगावॉट नोंदविण्यात आले आहे. शिवाय गुजरात व मुंबईसह कोकणातील ७ जिल्ह्यात पाच दिवस उष्णतेच्या लाट सदृश स्थितीसहित दमटयुक्त उष्णतेची स्थिती जाणवेल. त्यामुळे मुंबईकरांच्या त्रासात आणखी भर पडणार आहे.गुजरात व मुंबईसह कोकणातील ७ जिल्ह्यात पाच दिवस उष्णतेच्या लाट सदृश स्थितीसहित दमटयुक्त उष्णतेची स्थिती जाणवेल. उष्णतेचा प्रभाव मुंबई शहर, ठाणे येथे अधिक जाणवेल. संपूर्ण विदर्भ, मराठवाडा येथे कमाल तापमान सरासरीपेक्षा ४ ते ६ ने अधिक म्हणजे ४० ते ४४ दरम्यान राहील. २५ मे पर्यंत उष्णतेच्या लाटेची स्थिती जाणवू शकते. तर राज्यात २५ मे पर्यंत ढगाळ वातावरणासहित तुरळक ठिकाणी किरकोळ अवकाळी पावसाची शक्यता आहे, अशी माहिती हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

# सत्तर हजार विद्यार्थ्यांना मिळणार शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या महापालिकेच्या आणि सर्व माध्यमाच्या खाजगी शाळाची शैक्षणिक वर्षाची सुरुवात शनिवार दि.१५ जूनपासून होणार आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी सहा माध्यमाच्या ३२७ पात्र शाळेतील ७० हजार १८२ विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके देण्यात येणार असून एक जून नंतर सर्व शाळांना वेळापत्रकानुसार पाठ्यपुस्तके दिली जातील अशी माहिती महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी संजय जावीर यांनी दिली आहे.

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके बालभारती पुणे येथून दोन ट्रक पाठ्यपुस्तके सोलापूर शहर साधन केंद्र ०१, मनपा मराठी मुलांची केंद्र शाळा क्रमांक ६ येथे आली असून बालभारती पाठ्यपुस्तक मंडळाचे मराठी विभागाचे माजी सदस्य पद्माकर कुलकर्णी, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंडे, समग्र शिक्षाचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी रियाज अत्तार, यांच्या प्रमुख उपस्थितीत उतरून घेण्यात आली. याप्रसंगी प्रशांत साठे विषय साधन व्यक्ती, अमोल धस विशेष शिक्षक, प्रसन्न देवनुर, श्रीशैल भागानवर, राजू नाईकवाडी आदी कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर शहरातील मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू आणि उर्दू या सर्व माध्यमाचे मिळून ३२७ शाळा मधील पहिली ते आठवीच्या ७० हजार १८२ विद्यार्थ्यांना २ लाख ९२ हजार ९०२ पाठ्यपुस्तकांचे वाटप त्या-त्या भागातील लोकप्रतिनिधींच्या आणि मान्यवर पालकांच्या हस्ते शाळेच्या पहिल्याच दिवशी वाटप केले जाणार आहे. त्या दिवशी मुलांचे शाळेत जंगी स्वागत करण्यात येणार आहे. शाळांची स्वच्छता करणे, वर्गाची सजावट करणे, तसेच मुलांचे स्वागत वाजत गाजत करणे, यासह गुलाब पुष्प देऊन विविध रंगांचे फुगे उडवून आणि मिठाई देऊन करण्यात येणार आहे. याची तयारी करण्यासाठी शिक्षकांना दोन दिवस आधीच म्हणजेच गुरुवार दिनांक १३ जून पासून शाळेत उपस्थित राहण्याच्या सूचना प्रशासनाधिकारी संजय जविर यांनी केल्या आहेत.

**पुस्तकाला कोरी पाने जोडल्याने दप्तराचे ओझे कमी!**

यंदाच्या शैक्षणिक वर्षात इयत्ता निहाय सर्व विषयांचे चार भाग करण्यात आले आहेत. प्रत्येक भागात सर्वच विषयांचे धडे असणार आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या या पुस्तकात एक धडा संपल्यानंतर वहीचे एक पान जोडण्यात आले आहे. राज्य सरकारने ८ मार्च २०२३ साली राज्य सरकारने एक शासन निर्णय जारी केला आहे. यात विद्यार्थ्यांच्या पाठीवरील पुस्तकाचे ओझे कमी होणार आहे.

# वीज बोर्डाचा खांब सरळ करायलाही मुहूर्त मिळेना

**चाकण -:** खेड तालुक्यातील चासकमान परीसरात गुंजवडा (वरची वस्ती)या ठिकाणी भरत टोके आणि बाळासाहेब एरंडे यांच्या शेतात (एखाद्या सजीवाचा जीव घेण्याच्या प्रतिक्षेत)तग धरून उभा आहे या बाबत हा खांब सरळ करण्याबाबत वीज मंडळाकडे वारंवार विनंती करूनही आजतागायत या खांबाकडे वीज बोर्डाचे अधिकारी व कर्मचारी ढुंकूनही पहायला तयार नाही शिवार हा खांब वाकल्यामुळे त्यावरील जीवंत तारा अगदी एखाद्याने थोडा हात वर केल्यास सहजच हाताला लागतील अशा अवस्थेत एक वर्षापासून त्या परिसरातील शेतकऱ्यांना वेठीस धरून उभा आहे .

कार्यालयात वारंवार हेलपाटे मारूनही , आमच्या मागणीकडे हेतू परस्पर दुर्लक्ष केले जात आहे या कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांचे नियंत्रण आहे की नाही.आमचे वीजबिल थकले तर तत्काळ वीज कनेक्शन कट करायला हजर होतात, मग आम्हाला होणाऱ्या जीवघेण्या त्रासाचं काय, उद्या एखादी दुर्दैवी घटना घडल्यास याची जबाबदारी हे निष्क्रिय कर्मचारी व



अधिकारी यांचेवरच राहिलं याची जाणीव असावी.

संबंधित त्या वाकलेल्या खांबामुळे, शेतकरयांना त्यांच्या पाळीव जणावरांसाठी धोक्याचे असूनही संबंधित विभाग गेल्या एक वर्षापासून फक्त बघ्याची भूमिका घेत असेल तर आम्हाला नाईलाजाने,वीज मंडळाच्या कार्यालयांवर मोर्चा आणावा लागेल, वास्तविक पाहता पावसाळा सुरू होण्यापूर्वी हा खांब सरळ करणे गरजेचे आहे, आता सध्या वादळ वाऱ्याचे दिवस असून तो खांब केंव्हाही खाली पडून तारा जमीनीवर पडल्यास जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे.

## आंबवडे शाळेत स्नेहमेळाव्याचे आयोजन

# विद्यार्थ्यांकडून जुन्या आठवणींना उजाळा

**भोर :** आंबवडे, ता.भोर येथील नागेश्वर विद्यालयातील सन १९९३-९४ च्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत सुमारे ३० वर्षांनी स्नेहमेळाव्याचे आयोजन केले. यावेळी ८५ विद्यार्थ्यांनी हजेरी लावत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

सकाळी दहा वाजता पुणे, मुंबई, सातारा, रायगड, आंबवडे पंचक्रोशीतील विद्यार्थी, विद्यार्थिनी सुमारे तीस वर्षांनी एकत्र आल्याने व त्यापैकी काही जणांचे चेहरे तर शाळा सोडल्यानंतर पहिल्यांदाच दिसल्याने हे कोन ते कोन अशी मोठ्या आपुलकीने व कुतूहलाने एकमेकांची विचारपूस करत होतो.

शिक्षकांचे आगमन झाले की फुलांचा वर्षाव करत स्वागत केले. आकरा वाजता घंटा वाजल्यानंतर प्रार्थनेने स्नेहमेळाव्याला प्रारंभ झाला. त्यानंतर विद्यार्थी,





विद्यार्थिनी आपल्या जुन्या वर्गात बसल्यावर हजेरी घेण्यात आली.मुख्याध्यापकांनी हजेरी घेतली व सर्व माजी विद्यार्थी विद्यार्थिनीचे स्वागत केले. गुरुजनांचा सत्कार माजी विद्यार्थ्यांनी केल्यानंतर प्रत्येकाने आपआपली ओळख करून दिली. नोकरी व्यवसाय कौटुंबिक माहिती शाळेतील जून्या आठवणींना उजाळा दिला.

मेळाव्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक थोपटे सर, धुमाळ सर, रसाळ सर, बारदेसकर सर आदी आजी माजी शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश बागल, संजय मोरे, हनुमंत धुमाळ, शंकर चिकने, संतोष जाधव, आनंद खोपडे, अशोक खोपडे, दिपक दोडके, राजेश देशमाने, राजेंद्र जेधे, राम जेधे, ज्योती सोनवणे, उज्वला शेटे, भारती तुपे, स्वाती शिळीमकर, रुपाली देसाई, वनिता दरेकर यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष घोरपडे यांनी केले तर आभार गणेश मोरे यांनी मानले.

## क्राईम

### वाहनाचा अपघात केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** पुणे बेंगलोर महामार्गावर गौरीशंकर कॉलेजच्या समोर अशोक लेलँड ट्रक व स्कार्पिओ गाडी यांच्यात १७ मे रोजी सकाळी अकरा वाजता धडक होऊन स्कॉर्पिओ वाहनाचे नुकसान झाले या प्रकरणी लखन किसन जाधव जिल्हा सातारा यांनी फिर्याद दिली आहे जाकीर रफिक बुडालेखानं वय २४ बसवेश्वरनगर रंग डोली बेळगाव याच्यावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे

१७ मे रोजी बोडलेखान यांनी अशोक लेलँड कंपनीचा ट्रक अविचाराने बेदरकारपणे चालवून गौरीशंकर कॉलेजच्या हद्दीमध्ये जाधव यांच्या स्कॉर्पिओ ला जोरात धडक दिली . या धडकेमध्ये स्कॉर्पिओ गाडीचे बोनेट चेपून गाडीची काच फुटली वाहनाचे प्रचंड नुकसान झाले आहे पोलीस हवालदार मोरे अधिक तपास करत आहेत

### लाथाबुक्याने मारहाण करून दीड तोळ्याची चेन लांबवली

**सातारा :** सांगितलेल्या रस्त्याने डंपर नेला नाही म्हणून आलेल्या रागात डंपर मालकाने दत्तात्रय जाधव यांना लाथाबुक्याने मारहाण केली. यावेळी झालेल्या झटापटीत त्यांच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची चैन लांबवली आहे. याप्रकरणी त्यांचे भाऊ रामचंद्र ज्ञानदेव जाधव वय ४९ राहणार नेले किडगाव जिल्हा सातारा यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे

सुरज मोहन गाडे, साहिल संजय कांबळे, व नल्लाप्पा फुटाणे यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे दिनांक १६ मे रोजी फिर्यादी जाधव यांचे भाऊ दत्तात्रय जाधव हे डंपर घेऊन जात होते त्यावेळी सुरज गाडे यांनी त्यांना गावातून डम्पर न नेता पीडब्ल्यूडी च्या रस्त्याने घेऊन असे सांगितले मात्र त्यांनी तो न नेल्याच्या रागातून गाडे यांच्यासह अन्य दोघांनी जाधव यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली व शिवीगाळ केली . यावेळी झालेल्या झटापटीमध्ये कोणीतरी त्यांच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची चैन चोरून नेली आहे पोलीस उपनिरीक्षक देशमाने अधिक तपास करत आहेत

### किरकोळ कारणावरून एकाला फरशीने मारहाण

**सातारा :** म्हसवे तालुका सातारा येथे मातोश्री पार्कच्या परिसरात किरकोळ कारणाच्या वादातून दारूच्या नशेत एकाला फरशीच्या तुकड्याने बेदम मारहाण करण्यात आली या मारहाणीत सुभाष जालिंदर फाटोळे राहणार मातोश्री पार्क म्हसवे तालुका सातारा यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे

राहुल प्रजापती यांच्यावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. दिनांक १८ मे रोजी रात्री अकराच्या दरम्यान दारूच्या नशेत प्रजापती यांनी फाटोळे यांना जुन्या वादातून शिवीगाळ करून हाताने मारहाण केली तसेच रस्त्यावर पडलेला फरशीचे तुकडे आणि त्यांच्या डोक्यात मारल्याने ते जखमी झाले आहेत पोलीस हवालदार माने अधिक तपास करत आहेत

### जिल्हा कारागृहामध्ये कायद्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**सातारा :** सातारा जिल्हा मध्यवर्ती कारागृहात सुरज राजू माने राहणार लक्ष्मी टेक पाण्याच्या टाकीजवळ सदर बाजार याने कोठडी क्रमांक नऊ येथे टॉवेलच्या साह्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली आहे

याप्रकरणी सतीश बाळासाहेब शिंदे पोलीस शिपाई यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे .दिनांक १८ मे रोजी रात्री पावणे बाराच्या दरम्यान हा प्रकार घडला उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली . प्राप्त माहिती नुसार सातारा जिल्हा कारागृहात कोठडी क्रमांक नऊ येथे माने याने टॉवेलच्या साह्याने स्वतच्या गळ्याला टॉवेलने फास लावून आत्म्यहत्येचा प्रयत्न केला . तसेच आत्महत्या करताना स्वतःला मारहाण करून जखमी करण्याचा प्रयत्न केला पोलीस हवालदार सुडके अधिक तपास करत आहे.

### बेकायदेशीर रित्या मद्य बाळगल्या प्रकरणी एकावर कारवाई

**सातारा :** बोगदा परिसरात पान टपरीच्या आडोशाला बेकायदेशीररित्या मद्य बाळगल्या प्रकरणी रमेश पुंडलिक निंबाळकर यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ मे रोजी सायंकाळी सव्वा सात वाजता बोगदा परिसरात पोलिसांनी केलेल्या कारवाई ९० मिलीच्या एकूण तीनशे बाटल्या जप्त करण्यात आल्या त्याची किंमत दहा हजार पाचशे रुपये इतकी आहे याप्रकरणी सागर दिलीप गायकवाड यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे



# आसनगावसह परिसरात पावसाची जोरदार हजेरी

## वाघोली येथील जिल्हा परिषद शाळेचे नुकसान

**आसनगाव :** कोरेगाव तालुक्यातील उत्तर कोरेगाव परीसरातील आसनगावसह परीसरात पाऊसाने धुमाकूळ घातला वार्यासह जोरदार आलेल्या पाऊसाने आहाकार माजवत काही ठीकाणी नुकसान केले आहे.

या वादळी पाऊसामुळे परीसरातील वाघोली येथील जिल्हा परिषद शाळेचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. अचानक व जोरदार आलेल्या पाऊसामुळे नागरीकांची, दुचाकीस्वारांची चांगलीच तारांबळ उडाली परीसरातील आसनगाव,अंबवडे सं वाघोली ,अनपटवाडी,वाघोली, वाठार स्टेशन सह परीसरातील इतर गावांना पाऊसाने चांगलेच झोडपले.

# सातारा जिल्ह्याला जोरदार वादळी पावसाने झोडपले

**सातारा :** सातारा जिल्ह्याला सोमवारी जोरदार वादळी पावसाने झोडपले. सातारा शहरात दुपारी हलका तर सायंकाळी वादळी वाऱ्यासह सुमारे अर्धा तास जोरदार मुसळधार पाऊस झाला. दरम्यान जिल्ह्याच्या अनेक भागात वादळी वारे, विजांच्या कडकडाटांसह जोरदार पाऊस झाला.

सातारा शहर व परिसरात दुपारी हलकासा पाऊस झाला. दिवसातील बहुतांश वेळ ढगाळ वातावरण होते. सायंकाळी सहाच्या सुमारास ढगांमुळे पूर्ण काळोख दाटून आला. सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटांसह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. सुमारे अर्धा तास आलेल्या पावसामुळे रस्त्यांवर पाण्याचे लोंढे वाहू लागले. वादळी वाऱ्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला.

सायंकाळी बाजारपेठेत आलेल्या नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. अनेकांनी दुकानांच्या, हॉटेल्समध्ये आसरा घेतला. दरम्यान, उपनगरे आणि ग्रामीण भागातही पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या.तसेच कऱ्हाड तालुक्यातील



कोपर्डे हवेली व परिसरात दुपारी चार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे अनेकांच्या घरांचे तसेच शेडवरील पत्रे उडाले. काही शेतकऱ्यांच्या टोमॅटो पिकांचे नुकसान झाले तर अनेक शेतकऱ्यांची झाडे शिवारात कोलमडून पडली. तांबवे परिसरात सोमवारी दुपारी मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली. यामध्ये विद्युत पुरवठा खंडित झाला आहे.

अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तसेच विद्युत खांब वाकले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तांबवे गावातील नवीन रस्ता कडेला उभी असेले विद्युत खांब वाकले आहेत.

तांबवे, आरेवाडी, डेळेवाडी, उत्तरतांबवे, गमेवाडी, साजुर या गावांत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला.येणपे, लोहारवाडी येथे अनेक घरांवरील पत्रे अँगलसह उडून जाऊन इतरत्र पडले. विद्युत तारा तुटल्याने लोहारवाडीकरांना अंधारात बसावे लागले. सातारा व सांगली जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या लोहारवाडीला वळीवाने रविवारी सायंकाळी झोडपून काढले. जनावरांच्या शेडवरील पत्रा वळवाच्या तडाख्यात उडून नजीकच्या त्यांच्याच घरावर पडल्याने त्यांचे नुकसान झाले. वादळी वाऱ्याने अनेकांचे संसार उघड्यावर पडले असून नुकसानग्रस्तांचे तातडीने पंचनामे करुन संबंधितांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी केली जात आहे.वाई शहरासह तालुक्यात जोरदार झालेल्या पावसामुळे भाजी मंडईसह शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांची त्रेधातिरपिट उडाली. सध्या शेतात पाणी शिरण्याची शक्यता असल्याने बागायती शेतातील गहू, हरभरा, ज्वारी या काढणीला आलेल्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

### खटावमध्ये पावसाची हजेरी

**खटावसह परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून हुलकावणी देत असलेल्या अवकाळी पावसाने अचानक जोरदार हजेरी लावली. सायंकाळी पाच वाजल्यापासून अचानकच विजेच्या गडगडासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे फळबागाचा तसेच अन्य शेती पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. पावसाच्या आगमनानंतर वीज पुरवठा खंडित झाला आहे पावसापासून बचाव करण्यासाठी अनेकजणांनी देऊळ तसेच मोकळ्या मंडपाचा आधार घेतला.**

### बिदाल परिसरात वादळी पाऊस

**दहिवडी : बिदाल परीसरातील शेरेवाडी येथे सायंकाळी सहाच्या सुमरास सलग दुसऱ्या दिवशी पावसाने झोडपले. वादळी वारा व पाऊस आल्याने शेरेवाडी येथील शेतकरी किसन बाबुराव भुजबळ यांच्या घरावरील पत्रा उडून धान्य व जिवनआवश्यक वस्तू भिजून मोठे नुकसान झाले. तसेच अनेक झाडे उन्मळून पडल्याने वीज पुरवठा खंडीत झाला.**

# म्हसवड शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करा

### काँग्रेस शिष्टमंडळाचे जिल्हाधिकार्यांना साकडे ।

**म्हसवड :** म्हसवड शहराला सध्या भिषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत असुन ही टंचाई दुर करण्यास पालिका प्रशासन असमर्थ ठरले असल्याने म्हसवडकर जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल सुरु आहेत, म्हसवडकरांची पाणीटंचाई त्वरित दुर करण्यासाठी आता जिल्हा प्रशासनानेच गंभीरतेने पाऊले उचलावीत याकरीता म्हसवड राष्ट्रीय काँग्रेसच्या पदाधिकार्यांनी प्रदेश किसान काँग्रेस चे उपाध्याय प्रा. विश्वंभर बाबर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी सातारा यांची भेट घेत याकडे लक्ष देण्याची मागणी केली.

दरम्यान म्हसवड येथील पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाई बाबत आपण गंभीर असुन संदर्भात तातडीची बैठक आयोजित करण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी काँग्रेस पदाधिकारी शिष्टमंडळाला दिले.

प्रदेश किसान काँग्रेसचे उपाध्यक्ष कृषिरत्न प्रा. विश्वंभर बाबर म्हसवड शहर काँग्रेसचे अध्यक्ष विकास गोजारी, युवक काँग्रेसचे दाऊद मुल्ला, सुहास भिवरे इत्यादी मान्यवरांनी जिल्हाधिकारी सातारा यांची म्हसवड येथील पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाई बाबत भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. म्हसवड शहरात दहा ते बारा दिवसाच्या अंतराने पिण्याचे पाणी पुरविले जातअसून त्यामुळे जनतेत तीव्र नाराजी पसरली असल्याचे काँग्रेस शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना सांगितले. याशिवाय सध्या पुरवली जाणारे पाणी अस्वच्छ असून त्यामुळे रोगराई वाढण्याची भीती यावेळी व्यक्त करण्यात आली. मूळ पाणीपुरवठा योजनेतील वरचेवर होणारे घोटाळे, नवीन मंजूर असणाऱ्या पाणीपुरवठा योजनेतील कामाचे चुकीचे नियोजन, अल्पावधीत झालेली पाणीपुरवठ्याची कामे दुय्यम दर्जाची व त्यामध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत प्रा. बाबर व शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना तपशीलवार माहिती दिली. म्हसवड येथील पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईमध्ये नागरिक हवालदिल झाले आहेत.

पाणीटंचाईमुळे महिला, छोटे मोठे व्यवसायिक यांच्यामध्ये तीव्र नाराजी असल्याचे शिस्तमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले तातडीचा पर्याय काय असे जिल्हाधिकारी यांनी विचारले असता शहरासाठी टँकरच्या माध्यमातून पिण्याचे पाणी पुरवण्याची गरज असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. याबाबत तातडीने उपाययोजना न झाल्यास सर्वपक्षीय आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रीय काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# तासवडे, वराडे येथे वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा तडाखा

**उंब्रज :** कराड तालुक्यातील तासवडे, वराडे येथे सोमवारी २० रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा तडाखा बसला. या पावसाने तासवडे येथील अनेक घरांचे नुकसान झाले आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर झाडे उन्मळून पडली असून वीज वाहक तारांचे खांब तुटले असून वीज वाहक तारा तुटले आहेत. तासवडेतील बेघर वस्तीतील सुमारे १५ घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. एका घरात अडकून पडलेल्या तिघांना तेथील ग्रामस्थांनी वराडे येथे वादळी वाऱ्याने अनेक घरावरील पत्रे उडून गेल्याची घटना घडली असून पिके व झाडांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सुमारे अर्धा तास सोसाट्याच्या वारा वाहत होता. यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

याबाबत अधिक माहिती अशी की कराड तालुक्यातील तासवडे वराडे परिसराला सोमवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने झोडपून काढले. वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने तासवडे व वराडे येथील अनेक घरांचे पत्रे उडाल्याच्या घटना घडल्या आहेत.

तासवडे टोलनाक्यांनजिक असणाऱ्या एमआयडीसी येथील बेघर वस्तीतील सुमारे १५ घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यातील सहा जणांचा संसार उघड्यावर पडला आहे. वारे वाहत असताना घराचा छत उडून गेल्याने अडकून पडलेल्या एका घरातील तिघेजण तेथील ग्रामस्थांनी केलेल्या मदतीमुळे बचावले आहेत..सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्याला सुरुवात झाली यामुळे तासवडे बेगर वस्ती येथील महादेव जगन्नाथ वायदंडे यांच्या घराचा पूर्ण छत उडून गेल्याने संपूर्ण संसार उपयोगी साहित्य, कपडे,धान्य उघड्यावर पडले आहे.

### पांडेवाडी येथे अंगावर भिंत पडून वृद्धाचा मृत्यू

**वाई :** वाई तालुक्यातील पांडेवाडी येथे झालेल्या अवकाळी पावसाने संतोष विनायक शिंदे यांच्या घराची भिंत नामदेव गणपती शिंदे (७०) यांच्या अगांवर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांची सून, नातू हे दोघे जखमी झाले असून दोघांना उपचारासाठी वाई येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की वाई तालुक्यात अवकाळी पाऊस सुरू असताना पांडेवाडी येथे संतोष शिंदे यांच्या घरालगत नामदेव गणपती शिंदे हे झाकण घालण्याच्या गडबडीत असताना भिंत पडली. त्यात ते भिंतीखाली सापडले. दरम्यान बाजूला असलेली त्यांची सून व नातू हे जखमी झाले. ग्रामस्थांनी आणि पोलीस पाटील यांनी लगेच त्यांना उपचारासाठी वाई येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, नामदेव गणपती शिंदे यांचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

# खरीप हंगामासाठी जिल्ह्यात बैठक

**सातारा :** सन २०२४ मधील खरीप हंगामाबाबत आढावा घेण्यासाठी तालुकास्तरावरील सर्व कृषि निविष्ठा परवानाधारक यांची बैठक आयोजित केली आहे. सदरची बैठक जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी विजय माईनकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

ही बैठक पाटण पंचायती समिती येथे मंगळवार, दि. २१ रोजी सकाळी १०.३० तर कराड येथे दुपारी ३.३० वाजता. खटाव येथे बुधवार दि. २२ रोजी सकाळी १०.३० वाजता तर माण येथे दुपारी ३.३० वाजता. जावली येथे शुक्रवार दि. २४ रोजी सकाळी १०.३० वाजता तर महाबळेश्वर येथे दुपारी ३.३० वाजता. फलटण येथे मंगळवार, दि. २९ रोजी सकाळी १०.३० वाजता तर खंडाळा येथे दुपारी ३.३० वाजता. कोरेगाव येथे बुधवार, दि. २९ रोजी सकाळी १०.३० वाजता तर सातारा येथे दुपारी ३.३० वाजता आणि वाई येथे गुरुवार, दि. ३० रोजी सकाळी १०.३० वाजता खरीप हंगाम आढावा बैठक होणार आहे.

तरी आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि निविष्ठा परवानाधारक यांनी या बैठकीस उपस्थित रहावे असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

### रुद्रनिल कपिल जाधव याची ऑल इंडिया सैनिक स्कूल साठी निवड

**लोणंद :** भारत सरकारच्या सैनिक मंत्रालयामार्फत घेण्यात आलेल्या ऑल इंडिया सैनिक स्कूल एंट्रास परीक्षेमध्ये लोणंद येथील कु. रुद्रनिल कपिल जाधव याने घवघवीत यश संपादन करून चंद्रपूर येथील सैनिक स्कूल मध्ये प्रवेश मिळविला आहे. लोणंद येथील सम्राट उद्योग समूहाचे व्यवस्थापक कपिल धन्यकुमार जाधव व सौ. स्वाती कपिल जाधव यांचा तो मुलगा आहे .

कु. रुद्रनिल कपिल जाधव जि.प.प्राथमिक शाळा कोपर्डे येथे शिकत होता. राज्य शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या अनेक स्पर्धात्मक परीक्षेमध्ये त्याने यापूर्वी अनेकदा यशाला गवसणी घातलेली आहे.

# मेघगर्जनेसह खंडाळा तालुक्यात पावसाची हजेरी

**खंडाळा :** खंडाळा तालुक्यात मेघगर्जनेसह पावसाने तासभर हजेरी लावली.सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या पावसामुळे बळीराजा सुखावला असून पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना वेग येईल अशी शक्यता वर्तविली जात आहे.

सोमवारी सकाळपासून उकाडा वाढला होता.सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पावसाचे आगमन झाले.पारगाव खंडाळ्यासह ठिकठिकाणी झालेल्या पावसाने हवेत गारवा निर्माण झाला आहे.सायंकाळी घराकडे परतणाऱ्या चाकरमान्यांची तारांबळ झाली.तर रात्री उशिरापर्यंत वीज पुरवठा खंडित झाला होता.

सध्या उन्हाची तीव्रता अधिक असून विहिरींच्या पाण्याने तळ गाठला आहे. त्यामुळे उन्हाळी पिक सुकू लागली असून पावसाच्या आगमनाने काही प्रमाणात पिकांना संजीवनी मिळाली. तसेच झालेल्या पावसामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, रविवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह तालुक्यात पावसाने हजेरी लावली.पारगांव - खंडाळा बसस्थानका -जवळ सतिश गोविंद खंडागळे यांच्या घराजवळ लिंबाचे मोठे झाड वादळी वाऱ्यामुळे दोन जर्सी गाईवर कोसळले. यामध्ये एक गाय जागीच ठार झाली तर एक गाय गंभीर जखमी झाली .यामध्ये खंडागळे यांचे एक लाख रुपयांचे नुकसान झाले .

तर वादळी वाऱ्यामुळे खंडाळा -हरळी,खंडाळा-लोहोम रस्त्यावर झाडे उन्मळून पडल्याने काही काळ वाहतुक ठप्प झाली होती.तर पोलिसांनी पडलेली झाडे बाजुला काढत रस्ते खुले केल्याची माहिती मिळत आहे. त्याचप्रमाणे रविवारच्या पावसामुळे फळ बगांचे



नुकसान झाले. नुकसानग्रस्त भागात महसूल प्रशासनाकडून पंचनामे सुरु असल्याचे सांगण्यात आले.

सोमवारी विजेचा लखलखाट आणि मेघगर्जनेसह पाऊस रात्री उशिरा पर्यंत बरसत होता.सलग दुसऱ्या दिवशी पावसाचे आगमन झाल्यामुळे पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना वेग येईल अशी शक्यता वर्तवली आहे.त्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

# आपण जे नाटक पाहतो त्यात खूप आनंद आणि समाधान : अलका कुबल - आठल्ये

**दैनिक राजदंड**

**पुणे :** नाटकाशी माझी नाळ जोडलेली आहे. आपण जे नाटक पाहतो त्यात खूप आनंद आणि समाधान मिळून जाते, असे प्रतिपादन अभिनेत्री अलका कुबल-आठल्ये यांनी केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद तळेगाव दाभाडे शाखेच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त येथील गोळवलकर मैदान येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. 'कला गौरव पुरस्कार' महाराष्ट्राची हास्य जत्रा फेम विशाखा सुभेदार व पंढरी कांबळे यांना अभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार सुनील शेळके, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष



बापूसाहेब भेगडे, पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष जनार्धन रणदिवे, नाट्य परिषद मध्यवर्ती शाखेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, नाट्य परिषद तळेगाव शाखेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे, बबनराव भेगडे, गणेश काकडे, विलास काळोखे, संग्राम जगताप, बसवराज पाटील, ड.सुभाष मोहिते, सरदार याज्ञसेनी दाभाडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना अलका कुबल - आठल्ये म्हणाल्या, की नाट्य परिषदेने कला गौरव पुरस्कारासाठी नेमक्या व्यक्तींची निवड केली आहे. विशाखा सुभेदार व पंढरी कांबळे यांनी रसिकांना भरभरून हसविले आहे. त्यामुळे त्यांचा सन्मान केल्याने मनाला समाधान मिळाले आहे.

भाऊसाहेब भोईर म्हणाले, की शहराची प्रसिद्धी किती इन्फ्रास्ट्रक्चर आहे, यावर नसते; तर सांस्कृतिक वातावरण कसे आहे, यावर अवलंबून असते. कलापिनी, अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद या संस्थामुळे तळेगावच्या नवलौकिकात मोठी भर पडली आहे.

दरम्यान, नाट्य परिषदेचे सल्लागार चंद्रकांत भिडे यांना अमृत महोत्सवानिमित्त जीवनगौरव पुरस्कार, तर नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष नितीन शहा व नाट्य परिषदेचे आधारस्तंभ ज्येष्ठ रंगकर्मी अभय लिमये यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तत्पूर्वी, मधुसूदन ओझा प्रस्तुत रजनीगंधा हा हिंदी मराठी गाण्यांच्या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

पुरस्काराला उत्तर देताना पंढरीनाथ कांबळे म्हणाले, की या पुरस्कारामुळे मोठी जबाबदारी वाढली आहे. विशाखा सुभेदार यांनी सांगितले, नाट्य परिषद हे माझे माहेर आहे. उतारवयामध्ये कलाकारांना साथ द्याल, ही अपेक्षा आहे. प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे यांनी, सूत्रसंचालन डॉ. विनया केसकर यांनी, तर आभार प्रसाद मुंगे यांनी मानले.

आमदार शेळके व बापूसाहेब भेगडेंमध्ये रंगला कलगी तुरा..

नाट्य परिषद तळेगाव दाभाडे शाखेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे यांनी प्रास्ताविकात तळेगावमध्ये नाट्यगृह व्हावे, ही अनेक वर्षांची मागणी असल्याचे सांगितले. हाच धागा पकडून 'नाट्य परिषदेचा २१ वा वर्धापनदिन नाट्यगृहामध्येच साजरा होईल, असा विश्वास आमदार सुनील शेळके यांनी व्यक्त केला. यावर बापूसाहेब भेगडे यांनी नाट्यगृह हे आधीच झाले असते,

परंतु आमदार शेळके यांच्या विरोधामुळेच नाट्यगृह झाले नसल्याचे सांगितले. यावर शेळके यांनी 'माझं नाव न घेता ते बीजेपी वाले असे म्हणा, कारण आता मी तुमच्या पक्षात आलो आहे.